
MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor: 6.91

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol.I, Issue-XXXV, 15 August 2021



## भारताच्या स्वातंत्र्याची अमृतवर्षाच्या दिशेने झालेली वाटचाल

## INDIA'S INDEPENDENCE TOWARDS AMRIT VARSHA

Editor : Dr. Dharampurikar Bhalchandra Vaijanathrao

Quarterly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

ISSN: 2454 – 7905

*SJIF Impact Factor:* 6 . 91

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

***A Peer Reviewed Referred Journal***

**Quarterly Research Journal**

**(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)**

**www.wiidrj.com**

**Vol. I Special ISSUE - XXXI Year – 7 15 August 2021**

## भारताच्या स्वातंत्र्याची अमृत वर्षाच्या दिशेने झालेली वाटचाल

**Special Issue Editor by**

**Dr. Dharampurikar Bhalchandra Vaijanathrao**

Dept. of Political Science

N. S. B. College, Nanded.

**<u>Editor in Chief</u> : Mrs. Pallavi Laxman Shete**

Principal, Sanskrti Public School, Nanded. (MH. India) Email: Shrishprakashan2009@gmil.com

**<u>Director</u> : Mr. Tejas Rampurkar**

(For International contact only +91-8857894082)

**Address for Correspondence :** House No.624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605 (India -Maharashtra) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com umbarkar.rajesh@yahoo.com **Mob. No:** +91-9623979067 **Website: www.wiidrj.com**

| | | | |
|---|---|---|---|
| 35. | भारत - जपान संबंध एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. एस. एम. वाघ | 161 |
| 36. | भारत व अमेरिका संबंध | डॉ. संजय गायकवाड<br>प्रा. डॉ. संतोष कोल्हे | 165 |
| 37. | स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय मुद्राचित्रण कलेचा प्रवास | डॉ. सचिन रामराव हजारे | 168 |
| 38. | स्वातंत्र्योत्तर काळातील वन कायदे व आदिवासींचे आर्थिक जीवन | सृष्टी मणचेकर<br>डॉ. अमोल गायकवाड | 172 |
| 39. | स्वातंत्र्यानंतरची भारतीय अर्थव्यवस्था : एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. विजय मांटे | 179 |
| 40. | जागतिकीकरण व ग्रामीण विकास | डॉ. उल्हास रामजी राठोड | 185 |
| 41. | भारतातील जागतिकीकरणाचे उद्गाते पी. व्ही. नरसिंहराव : एक चिकीत्सक अध्ययन | डॉ. सुभाष दौलतराव उपाते | 190 |
| 42. | पंचवार्षिक योजनेतनेतील बदल | डॉ. राजेश गं. उंबरकर | 199 |
| 43. | स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील लोकसंख्या व लिंग रचनेत झालेला बदल | डॉ. विजया एच. गायकवाड | 209 |

# भारतातील जागतिकीकरणाचे उद्गाते पी. व्ही. नरसिंहराव : एक चिकीत्सक अध्ययन


## डॉ. सुभाष दौलतराव उपाते

सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली – 441207


**प्रस्तावना :**

विसावे शतक हा भांडवलशाहीच्या आत्यंतिक विजयाचा काळ ठरतो.इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी ही युरोपीय राष्ट्रे युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि पूर्व आशियातील जपान ही या शतकात अग्रगण्य राष्ट्रे ठरली."औद्योगिक क्रांती नंतर राष्ट्रवादाचा उदय, विज्ञानाचा विकास, नवे तंत्रज्ञान परिणामी उत्पादनात वाढ होत गेली.दळणवळणाच्या साधनांमुळे राष्ट्रांचे परस्पर संबंध वृध्दींगत झाले.प्रारंभी इंग्लंड फ्रान्स नंतर सर्व युरोपखंड, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि जपाण यांचाही समावेश झाला.होकायंत्रामुळे परस्पर परिचयातून व्यापार वृध्दी झाली. आशियातील जुनी राज्ये भारत, चिन, तुर्की साम्राज्यातील प्रदेश आणि इराण ही या जागतिकीकरणात परिघावरची राष्ट्रे म्हणून सामिल झाली"[1] "मार्शल योजनेनुसार अमेरिकेचे शेतीतील उत्पादन युरोपीय राष्ट्रांनी विकत घ्यावे या अटीमुळे अमेरिकेच्या उत्पादन वाढीला हातभार लागला व अमेरिका हे जगातील सर्वात श्रीमंत व बलवान राष्ट्र म्हणून पुढे आले. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी , जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना यावर अमेरिकेचा वाढता प्रभाव परिणामी जागतिकीकरणाचे धोरण गरीब राष्ट्रांना स्विकारावे लागले.[2]

1991 सालच्या लोकसभेच्या निवडणूकीनंतर केंद्रामध्ये नरसिंहराव यांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेसचे सरकार अस्तित्वात आले आणि देशाच्या स्वातंत्र्यानंतर तत्कालिन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी पुरस्कृत केलेले व अनेक वर्ष चालू असलेले आर्थिक नियोजनाचे धोरण सोडून त्यांनी नवीन आर्थिक धोरण स्विकारले. 20 व्या शतकातील हे शेवटचं दशक स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वाधिक आव्हाणात्मक दशक ठरलं."युनियन ऑफ सोव्हीयत सोशालिस्ट रिपब्लिक" (USSR) या साम्यवादी देशाचे राष्ट्राध्यक्ष मिखाईल गोरबाचेव्ह यांनी 25 डिसेंबर 1991 ला आपल्या पदाचा राजीनामा दिला आणि 26 डिसेंबर 1991 रोजी या देशाचं विघटन झालं. एकंदरीत राजकीय समीकरणच बदलली आणि जगातील सत्ता / संतुलनही ढळलं.1991 मध्येच नरसिंह राव पंतप्रधान पदी असतांनाच मनमोहन सिंग अर्थमंत्री झाले आणि भारताने उघडपणे खुल्या अर्थव्यवस्थेचं व उदारीकरणाचं धोरण स्विकारलं."स्वातंत्र्यानंतर जवळजवळ चार दशकं समाजवादाची कास धरणाऱ्या भारताने 1990 च्या दशकात खासगीकरणाचा स्विकार करून आपल्या आर्थिक सुकाणूची दिशा बदलली ; यामागे सोव्हीयत युनियन चे पतन हे एक महत्वाचं कारण आहे."[3]

**संशोधन पध्दती :**

- प्रस्तुत संशोधनासाठी विषयाची निवड
- संबंधित साहित्याचे सर्वेक्षण
- संशोधन समस्येला परिभाषीत करणे